SANDU PHARMACEUTICALS LTD
Regd. Office: Plot Nos. 25, 26, 29 & 30, Pilerne Industrial Estate, Marra, Saligao, Bardez, Goa 403511.
Tel: +91 832 2407474 / 6715000, E-mail: sandupharma@sandu.in

Ref:corp.sec/BSE /2024-25/247

Dated:07.09.2024

To,
Department of Corporate Services
Bombay Stock Exchange Limited,
Phirojshah Jeejobhoy tower,
Dalal Street,
Mumbai-400001.

**Sub: Intimation under Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements)regulations, 2015 Newspaper Advertisement for Notice of AGM and Evoting-Marathi Publication.**
**Ref :our letter dated 06.09.2024 with ref no corp.sec/BSE /2024-25/246.**

**ScripCode:**524703

**Respected Sir**

In continuation to our above mentioned reference No, Please find enclosed herewith Intimation about the 39th Annual General Meeting and Evoting instruction to be held on Monday,30th September 2024 published in Navprabha dated 07th September 2024.

The same is being posted on the Company's Website.

Thanking you,
Yours Faithfully,
**FOR SANDU PHARMACEUTICALS LTD.**

PRATIKA PRATHAMESH MHAMBRAY
Digitally signed by PRATIKA PRATHAMESH MHAMBRAY
Date: 2024.09.07 12:50:03 +05'30'

Pratika Mhambray
Company Secretary

## निवडक

### म्हापसा येथे रंगला सिनेगीतांचा कार्यक्रम

**थिवी नवा**

म्हापसा येथील स्वरबहार संस्थेतफै आयोजित स्व. मुकेश जाने कहा गये वो दिन हा काराओके हिंदी सिने गीतांचा कार्यक्रम म्हापसा येथील रायकर मिनी हॉल येथे पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रदीप जोशी उपस्थित होते. त्यांनी स्वरबहार ही संस्था दरवर्षी स्व. मुकेश व स्व. महम्मद रफी यांच्या हिंदी गीताचा कारोओके कार्यक्रम आयोजित करते व गायकाची एकप्रकारे त्याची आठवण म्हणून हा कार्यक्रम याबद्दल त्यानी स्वरबहार संस्थेचे कौतुक केले. यावेळी दिगंबर रायकर, मनोज शिरोडकर, संतोष शिरोडकर, विनीता वैलैकर सुनील चोडणकर, कृष्णराज बांदोडकर, अमीत दाभोलकर, रतन पाणंदिकर, रेश्मी शिरोडकर व नंदिनी नेरूरकर यांनी स्व. मुकेश यांच्या आवाजातील विविध चित्रपटांतील गीते सादर केली.

### कालिदास सातार्डेकरनी दिले विद्यार्थ्यांना मूर्तीकलेचे धडे

**पणजी (सां. प्र.)**

गणेश चतुर्थीत पुजेला लावली जाणारी गणपतीची मूर्ती कशी असावी याचा शास्त्राप्रमाणे आज विचार अभावानेच होताना दिसतो. आज अनेक आकारातील गणेश मूर्ती भक्तीभावाने पूजल्या जातात. गणेशाची मूर्ती पर्यावरणपूरक असावी ही मात्र आजच्या प्रदूषणकारी युगात अपेक्षा असते. आज आपल्या सोयीनुसार प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती सर्रासपणे आणल्या जातात. पर्यावरणाची हानी आपण कळत नकळत करतो, किंबहुना जाणीवपूर्वक आहोत. या पार्श्वभूमीवर काही शाळात कला शिक्षक विद्यार्थ्यांना मातीपासून गणपतीच्या मूर्ती बनवण्याचे धडे देत आहेत ही गोष्ट कौतुकास्पद आहे. अशा मूर्ती पालक अभिमानाने पूजेला लावतात याचे कौतुकही आहे. फोंडा येथील कामिलो परैरा मेमोरियल हायस्कूलचे कला शिक्षक तथा नामवंत चित्रकार कालिदास सातर्डेकर यांनी आठवी, नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मातीपासून गणपतीच्या मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत सहभागी घेतलेल्या १८ मुलांनी रस घेवून, समरस होऊन गणपतीच्या छान मूर्ती साकारल्या.

# ठाणे गणेशोत्सव मंडळाचे ९ दिवस भरगच्च कार्यक्रम

## सांस्कृतीक तसेच मनोरंजनाच्या कार्यक्रमांवर भर

## लहानांपासून ज्येष्ठ व्यक्तींसाठी विविध स्पर्धा

**वाळपई (न. प्र.)**

**ठाणे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. याची सुरुवात शनिवार दि. ७ सप्टेंबरपासून करण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्याकडून देण्यात आलेली आहे. या संदर्भात महत्त्वाची बैठक नुकतीच झाली. या बैठकीमध्ये समाजपयोगी, शैक्षणिक, वैचारिक, सांस्कृतिक, पारंपरिक कार्यक्रम आयोजित करण्यावर भर देण्यात आला व त्या संदर्भात सविस्तरपणे रचना करण्यात आलेली आहे.**

शनिवार दि. ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रींची प्रतिष्ठापना होणार असून रात्री ८ वाजता स्थानिक भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

**सायकल, रांगोळी स्पर्धा**

सोमवार दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्रींची पूजा, सकाळी १० वाजता स्व. महादेव आत्मा गावकर यांच्या स्मरणार्थ रुपेश गावकर यांच्याकडून पुरस्कृत करण्यात आलेली सायकल स्पर्धा होणार आहे. यामध्ये स्पर्धकांनी मोठ्या प्रमाणात भाग घ्यावा अशी विनंती



करण्यात आलेली आहे. सकाळी १०.३० वाजता महिलांसाठी रांगोळी स्पर्धा त्यानंतर गावठी फुलांपासून पुष्पहार बनविणे व संगीत खुर्ची स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ४ वाजता जागृती विवो ग्रामपंचायत ठाणे शेतकरी यांच्यातर्फे अशोक नवसो कदम पुरस्कृत पंचायत पातळीवर फुगडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ७ वा. आरती व तीर्थप्रसाद होणार आहे. रात्री ८ वाजता सुनील मावूसकर संयोजक सत्तरी संयुक्त दशावतार नाट्य मंडळ प्रस्तुत महान पौराणिक नाटक सादर करण्यात येणार आहे.

**कथाकथन स्पर्धा**

गुरुवार दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्रींची पूजा सकाळी दहा वाजता स्व. महादेव आत्माराम गावकर यांच्या स्मरणात रुपेश गावकर यांच्याकडून पुरस्कृत केलेली कथाकथन स्पर्धा व देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ वाजता सत्तरी तालुका पातळीवर घुमट आरती स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेली आहे त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न होणार आहे.

**बुद्धिबळ स्पर्धा**

मंगळवार दि. १० सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता ची पूजा सकाळी १० वाजता बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ५ वाजता जीवन एक संघर्ष या विषयावर ॲड .शिवाजी देसाई यांचे व्याख्यान होणार आहे. संध्याकाळी सात वाजता आरती व तीर्थप्रसाद, संध्याकाळी साडेसात वाजता ह. भ. प. सचिनबुवा जोशी यांचे कीर्तन होणार आहे.

बुधवार दि. ११ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वा. पूजा, ९.३० वाजता सनातन संस्थेतर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेली आहे. सकाळी १०.३० वा. स्व. महादेव आत्मा गावकर यांच्या स्मरणात रुपेश गावकर यांनी पुरस्कृत केलेली गणपती स्तोत्र पाठांतर व बडबड गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ७ वाजता आरती व तीर्थप्रसाद होणार आहे.

**चित्रकला स्पर्धा**

रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता श्रींची पूजा, सकाळी १०वाजता कै. महादेव आत्मा गावकर यांच्या स्मरणार्थ रुपेश गावकर यांच्याकडून पुरस्कृत करण्यात आलेली चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ७ वाजता आरती व तीर्थप्रसाद होणार आहे.

**वेशभूषा स्पर्धा**

शुक्रवार दि. १३ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वा. पूजा, सकाळी १० वाजता शिशुगट प्राथमिक गट व माध्यमिक गट यांच्यातर्फे वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. संध्याकाळी ४ वाजता गोवा कला व संस्कृती खाते पुरस्कृत विविध राज्यांचा सहभाग असलेला श्री गणेश यात्रा २०२४ हा महत्त्वाचा कार्यक्रम सादर होणार असून संध्याकाळी सात वाजता आरती व तीर्थप्रसाद होणार आहे.

शनिवार दि. १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आकाश आनंद बांदेकर यांच्या यजमान पदाखाली श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आलेले आहे. संध्याकाळी ५ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण व गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेली आहे. संध्याकाळी ७ वाजता आरती व तीर्थप्रसाद लातूर आठ वाजता देणगी कुपनचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. रात्री ९.३० वाजता श्री तनया कला संघ घोणशी नागेशी फोंडा निर्मित तुळशीदास घोणशीकर प्रस्तुत जावई घराण माव दारान हा नाटकाचा प्रयोग सादर करण्यात येणार आहे.

रविवार दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वा. पूजा संध्याकाळी ४ वाजता श्री नवदुर्गा दिंडी पथक ठाणे यांच्या सादरीकरणातून श्रींची उत्तर पूजा व त्यानंतर पावणे व विसर्जनचा कार्यक्रम थाटात संपन्न होणार आहे. या सर्व कार्यक्रमाचा गणेश भक्त व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजन समितीतर्फे करण्यात आलेले आहे.

# मोरजीतील चित्रशाळेतून कासारवर्णेत गणेशमूर्ती रवाना

**पेडणे (प्रतिनीधी )**

पोके वाडा मोरजी येथील बाबा पोके यांच्या दिडशे वर्षांपूर्वीच्या चित्रशाळेमधून घरगुती गणपतीबरोबरच आता सार्वजनिक गणेश मूर्तीही आकार घेऊ लागल्या आहेत. त्यातील कासारवर्णे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशाची भव्य उत्सव मूर्ती या चित्रशाळेमधून कासारवर्णे परिसरात नेण्यात आली. यावेळी कासारवर्णे गणेशोत्सव मंडळाचे सदस्य व मोठ्या संख्येने गणेश भक्त उपस्थित होते. श्री. पोके यांच्या चित्रशाळेमधून वाहनातून कासरवर्णे परिसरात मूर्ती नेत असताना सर्वांनी एकच जल्लोष केला.



**मोरजी येथून कासारवर्णे येथील सार्वजनिक मूर्ती नेताना गणेश भक्त.** (छाया : निवृत्ती शिरोडकर)

मागच्या कित्येक वर्षांपासून पोकेवाडा येथील बाबा पोके यांच्या चित्रशाळेमध्ये घरगुती गणपती मोठ्या संख्येने केले जात आहेत. आताची चौथी पिढी सार्वजनिक गणेश मूर्ती करत असताना दिसत आहे. मागच्या चार वर्षापासून कासरवर्णे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची मूर्ती बाबा पोके यांच्या चित्रशाळेमध्ये तयार केली जात आहे.

**विविध कार्यक्रमांचे आयोजन**

कासारवर्णे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे माजी अध्यक्ष बाबूराव गाड यांनी माहिती देताना सांगितले की, मागच्या सात वर्षांपासून कासारवर्णे परिसरात सार्वजनिक गणेश मूर्ती तयार करत असताना उत्सवामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे स्पर्धात्मक कार्यक्रम सांस्कृतिक कार्यक्रमाबरोबरच पर्यावरणपूरक सजावट केली जाते. कला आणि सांस्कृतिक खात्याअंतर्गत जी अखिल गोवा सजावट स्पर्धा आयोजित केली जाते. त्यामध्ये सलग तीन वर्षे प्रथम क्रमांकाचे बक्षीस आमच्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला प्राप्त झाले आहे. यंदाही मोठ्या प्रयासाने नव्या युवकांनी बारा ज्योतिर्लिंगाचा देखावा करण्यासाठी काम सुरू केले आहे. हे काम मागच्या तीन महिन्यांपासून युवक सायंकाळी आपला वेळ काढून सहानंतर मंदिराच्या परिसरात येतात आणि सजावट करण्यास हातभार लावतात.

मूर्तिकार उमाकांत पोके यांनी माहिती देताना, बाबा पोके यांच्या चित्रशाळेमध्ये मागच्या दिडशे वर्षापासून ही चौथी पिढी कार्यरत आहे. या चित्रशाळेमध्ये २०० पेक्षा जास्त घरगुती गणेश मूर्ती तयार करण्याचे काम सुरू आहे. आता सार्वजनिक गणेश मूर्तीही आकार घेऊ लागल्या आहेत. काही ठिकाणी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना प्राधान्य मिळत असल्याबद्दल उमाकांत पोके यांनी खंत व्यक्त केली.


**HIND RECTIFIERS LTD.,**
**Registered office:** Lake Road, Bhandup( W),
**MUMBAI - 400 078,** Maharashtra, India,

**LOSS OF SHARE CERTIFICATES**

**TO WHOMSOEVER IT MAY CONCERN**

This is to inform the General Public that the following share certificates has been lost, misplaced or stolen but not found so far. Any person who has any claim in respect of the said share certificate should lodge such complaint with the Company or its Registrar and transfer agents Adroit Corporate Services (P) Ltd. (Unit:Hind Rectifiers Limited) No.19/20,Jafferbhoy Industrial Estate,1st Floor, Makwana Road, Marol Naka, Andheri (E),Mumbai-400 059 within 15 days of publication of this notice, after no claims will be entertained and the Company shall proceed to issue Duplicate Share Certificates.

| Name of the Share Holder | Folio No. | Certificate No. | Distinctive Nos. | Shares |
|---|---|---|---|---|
| VALLABHDAS LADHAD | V000102 | 00021581 | From: 0010510701 To: 0010513700 | 3000 |

Goa
06.09.2024

- VALLABHDAS LADHAD


# आज महिलांची बहुतेक क्षेत्रांत पुरुषांशी बरोबरी : आमदार नाईक

## भाजपतर्फे आयोजित विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण



**विजेत्या स्पर्धेकांना बक्षिसे प्रदान करताना आमदार केदार नाईक. सोबत इतर मान्यवर.** (छाया : प्रणव फोटो)

**म्हापसा (न. प्र.)**

आजच्या धकाधकीच्या जीवनात नाव कमावणे साधे सोपे नाही. कोणत्याही क्षेत्रामध्ये आपले नाव व कर्तृत्व लोकांपुढे दाखवले जाते त्याला महत्त्व असते. आपल्या कणखर शक्तीनिशी काम करतात ते पुढे येतात. आज स्त्री शक्ती अनेक क्षेत्रातून पुढे येत आहे. राजकारण, कला, संगीत व इतर क्षेत्रांत महिला नाव मिळवत पुरुषाच्या बरोबरीने येत आहेत. त्यांचा आम्हां पुरुषांना अभिमान वाटत असल्याचे गौरवोद्गार साळगाव मतदारसंघाचे आमदार केदार नाईक यांनी काढले.

वेरे बार्देश येथील श्री शांतादुर्गा वेर्लेकरीण संस्थांनच्या सभागृहात साळगावचे आमदार केदार नाईक यांनी मतदारसंघातील भाजप महिला मोर्चासाठी श्रावण मास महिन्याअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या फाती तयार करण्याची स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी प्रमुख पाहुणे या नात्याने आमदार नाईक बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत जिल्हा पंचायत सदस्य संदीप बांदोडकर, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष करण गोवेकर, महिला मोर्चा अध्यक्षा शितल वझरकर व इतर मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन करण गोवेकर यांनी केले.

यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत प्रथम बक्षीस उज्वला कळंगुटकर (सांगोल्डा), दुसरे रोशनी आजरेकर (बेती), तिसरे दिक्षा मांद्रेकर (साळगाव) तर उतेजनार्थ बक्षिसे दीपिका पेडणेकर (साळगाव), सुनंदा कुंडणेकर (साळगाव), प्राची पालयेकर (नेरूल), प्रतिमा पुर्खे (सांगोल्डा), प्रांजली साळगावकर (वेरे), अनिषा आश्वेकर (नेरूल) यांनीबक्षइसे पटकावली.


**TRANSFER OF VEHICLE**

I, **Mrs. Sampurna Prajyot Bhagat, D/o Late Nirmala Fal Dessai, House No. 32, Patnem, Canacona, Goa - 403702,** would like to **transfer** the ownership of vehicle in my name. **due to the death of my mother (Mrs. Nirmala Fal Dessai). Ref MV No. GA 09 A 1924 (Zen Estilo LXI).** Anyone having any objection to the said transfer may lodge the same in writing to **Asst. Director of Transport/Director of Transport STA,** Canacona, Goa within **15 days** of this publication.



**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX-OFFICIO) OF BARDEZ JUDICIAL DIVISION AT MAPUSA, GOA**

**NO.CRSR/BARDEZ/NOT/1485/2024**
**Dated:- 06/09/2024**

**NOTICE**

Ms. Firdous Saba Bepari, Joint Civil Registrar -cum- Sub Registrar-II and Special Notary Ex-Officio of Bardez Judicial Division at Mapusa-Goa

In accordance with Sec. 346 (11) of the Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012, it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 26.08.2024 drawn by and before me Ms. Firdous Saba Bepari, Joint Civil Registrar -Cum-Sub Registrar II and Special Notary Ex-Officio Bardez at Mapusa at Page 73 onwards in the Notarial Book No.887 of this Office the following is recorded:-

That on 26.06.2024 died late Maria Da Fatima Nita Monteiro alias Maria Da Fatima Nita Gonsalves alias Maria Da Fatima Nita Gonsalves Monteiro alias Maria Da Fatima Nita Gonsalves E Monteiro expired at H.No.415/2, Tima Tonio Enclave, Alto Pilerne, Alto Porvorim, 403521 in the status of marriage to Mr. Antonio Camilo Anunciecao Monteiro alias Antonio Camilo Anunciacao Monteiro to whom she was married in her sole and only nuptials. That the said late Maria Da Fatima Nita Monteiro alias Maria Da Fatima Nita Gonsalves alias Maria Da Fatima Nita Gonsalves Monteiro alias Maria Da Fatima Nita Gonsalves E Monteiro died without making any Will, gift or other disposition of her last wish, leaving behind her moiety holder her husband and as her only and universal heirs and successors, her two sons and two daughter-in-laws, which are as follows- (1) Mr. Antonio Camilo Anunciecao Monteiro alias Antonio Camilo Anunciacao Monteiro, aged 72 years, son of late Caetano Monteiro, widower, Indian National, as moiety holder/half sharer, (2) Mr. Allvin Arthur Monteiro, son of Mr. Antonio Anunciecao Monteiro alias Antonio C. A. Monteiro, aged 49 years, married, service, Portuguese National, married to Mrs. Trilby Christine D'souza alias Trilby Christine Monteiro, aged 46 years, daughter of Shri. Linus Marcelino Dsouza, married, housewife, Indian National, (3) Mr. Aldrin R. Monteiro alias Aldrin Roque Monteiro, son of Mr. Antonio Monteiro alias Antonio C. A. Monteiro, aged 45 years, married, service, Portuguese National, married to Mrs. Tosca Fernandes alias Tosca Monteiro, aged 43 years, daughter of Shri. John Fernandes, married, housewife, Indian National, all residing at H.No.415/2, Tima Tonio Enclave, opp. Sangelkar Super Marker, Alto Porvorim, Bardez, Goa, 403521. Besides the aforesaid heirs, there are no other person or persons who as per prevailing law in force could prefer to the inheritance left by the said deceased.

Any person having objection to this deed may file in this Office within 30 days from the date of its publication.

Sd/-
**(Firdous Saba Bepari)**
Special Notary (Ex-Officio),
Bardez, Mapusa-Goa

Seal



**IN THE COURT OF MAMLATDAR OF BARDEZ AT MAPUSA- GOA.**

Mutation Case No. 94982
Village: Calangute

**1.** WRANGLER INFRA
a partnership firm, having its office at c-102, Palm Resorts, Rajnagar Extension, Ghaziabad, Uttar Pradesh 201017 ....Applicant

**V/S**

1. Anthony John D'Souza alias Antonio Joao Bonventure D'Souza
2. Derrick Hilary D'Souza alias Derrick Hillary also known as Derrick Hillary D'Souza or Derick Hilary D'Souza
3. Maria J. D'Souza alias Maria Josefina D'Souza ....Opponents

**PUBLIC NOTICE**

To,
The above name Opponents/Legal heirs if any/interested parties if any.

Where as the applicant WRANGLER INFRA, a partnership firm, having its office at c-102, Palm Resorts, Rajnagar Extension, Ghaziabad, Uttar Pradesh 201017, has applied for mutation under section 96 of L.R.C. 1968 to include its name in the occupants column under Sy. No.4/6 of Village Calangute, Taluka Bardez, after deleting the existing names of Maria Josefina Dsouza E D'Mello and Derrick Hilarty D'Souza alias Derrick Hillarty also known as Derrick Hillary D'Souza or Derick Hillary D'Souza, as per Deed of Sale registered under No. BRZ-1-2518-2023, dated 30-05-2023, Book 1 Document, Document Serial No. 2023-BRZ-2629, executed before Sub Registrar, Bardez. Applicant has placed on record Inventory Proceedings No. 42/2022/C dated 23-05-2022, passed in the Court of Sr. Civil Judge C Court at Mapusa.

AND WHEREAS, the notice in form No.X were generated to be served to the party by registered A/D. Party was unserved with postal remark as unserved, insufficient address. Party expired etc hence to be served through alternative means and so the notices are prayed to be served by way of publication in local newspaper.

AND WHEREAS, the applicant through its Partner, has prayed vide her application for substitute service, by publication of public notice in any one newspaper as required under order V Rule 20(1A) of C.P.C as the applicant does not know the legal heirs and the addresses of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notices failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the certifying Officer.

Seal

Sd/-
**(Anant Malik)**
Mamlatdar of Bardez
Mapusa Goa

Place: Mapusa
Date: 03-09-2024



**सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेड**

SANDU Trusted in Ayurveda

**सीआयएन: एल२४२३३जीए१९८५पीएलसी००१५८७, नोंदणीकृत कार्यालय – प्लॉट क्रमांक २५, २६, २९ आणि ३०, पिळर्ण औद्योगिक वसाहत, मार्रा, साळगाव, बार्देश, गोवा– ४०३ ५११. वेबसाईट : www.sandu.in ई–मेल : corp.secsandu.in दू. क्र.: ०८३२ ६७१५०१७**

**३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

प्रिय सदस्य हो,

या नोटिशीद्वारे सूचना देण्यात येत आहे की कंपनीची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('AGM') सोमवार ३० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ठीक ०४:३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्स ('VC') / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे ('OAVM') आयोजित केली जाईल. सर्वसाधारण सभा बोलावण्यासाठी प्रसारित केल्या जाणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या विषयांवर चर्चा केली जाईल. कंपनी कायदा २०१३ च्या नियम आणि सेक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) रेग्युलेशन्स २०१५ (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) तसेच कार्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) यांच्या वेळोवेळी जारी केल्या जाणाऱ्या परिपत्रकांनुसार ही सर्वसाधारण सभा बोलावण्यात येणार आहे.

पुढे, एमसीए/सेबी परिपत्रकांनुसार, वार्षिक सर्वसाधारण सभा/वार्षिक अहवालाची नोटीस ज्या सदस्यांचे ई–मेल पत्ते दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजीपर्यंत कंपनी/डिपॉझिटर नोंदणीकृत करण्यात आले होते त्या सर्वांना पाठवली आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस स्पष्टीकरणासह आणि आर्थिक वर्ष २०२३–२४ चा वार्षिक अहवाल यासह उपलब्ध आहे आणि कंपनीच्या वेबसाइट www.sandu.in आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवरून डाउनलोड करता येतील. त्यामध्ये कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि ई–मतदान सेवा प्रदात्याच्या वेबसाइटवर म्हणजेच नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडच्या (NSDL) www.evoting.nsdl.com या वेबसाईटवर आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटिसमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करून सदस्य व्हिडिओ कॉन्फरन्स / इतर दृकश्राव्य माध्यम सुविधांद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकतात.

कंपनी कायदा, २०१३ च्या लागू असलेल्या तरतुदींचे पालन करून, त्यानुसार बनविलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५ च्या लागू नियमांचे पालन करून, सदस्यांना एनएसडीएलद्वारे प्रदान केलेली रिमोट इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणाली वापरून वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करता येईल. याव्यतिरिक्त, कंपनी वार्षिक सर्वसाधारण सभेत ई–मतदान प्रणालीद्वारे मतदानाची सुविधा देखील प्रदान करत आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेत दूरस्थ ई–व्होटिंग/ई–व्होटिंगसाठी तपशीलवार प्रक्रिया सभेच्या नोटिशीमध्ये प्रदान केली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाने मेसर्स स्वप्निल जे दीक्षित अँड असोसिएट्सचे एसीएस श्री. स्वप्निल दीक्षित

कंपनी सचिवांना छाननीकर्ता म्हणून मतदान प्रक्रियेची निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने छाननी करण्यासाठी नियुक्त केले आहे.

रिमोट ई–मतदान शुक्रवार, २७ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० पासून सुरू होईल आणि रविवार,२९ सप्टेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता संपेल. नमूद तारखेच्या आणि वेळेच्या पलीकडे दूरस्थ ई–व्होटिंगला परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर एनएसडीएलद्वारे दूरस्थ ई–मतदान प्रणाली निष्क्रिय केली जाईल.

व्हिडिओ कॉन्फरन्स / इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे वार्षिक सर्वसाधारण सभेला हजर राहिले आहेत, पण ठरावावर मतदान केले नाही आणि मतदानास मनाईही नाही ते सदस्य सभेवेळी दूरस्थ इ–मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. दूरस्थ इ–मतदान प्रणालीद्वारे मतदान केल्यावर सदस्य सभेला उपस्थित राहू शकेल, पण त्यास पुन्हा बैठकीत मतदान करण्यास मतदान करता येणार नाही.

ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे देखभाल केलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये कट ऑफ तारखेनुसार म्हणजेच गुरुवार, १९ सप्टेंबर २०२४ रोजी नोंदवले गेले आहे, त्यालाच फक्त वार्षिक सर्वसाधारण सभेत दूरस्थ ई–मतदान किंवा मतदानाची सुविधा मिळण्याचा हक्क असेल. सदस्यांचे मतदानाचे हक्क कट ऑफ तारखेनुसार कंपनीच्या पेड–अप इक्विटी शेअर भांडवलामध्ये त्यांच्याकडे असलेल्या समभागांच्या प्रमाणात असतील.

कोणतीही व्यक्ती, जी कंपनीचे शेअर्स मिळवते आणि कंपनीने नोटीस इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठवल्यानंतर कंपनीची सदस्य बनते आणि कट ऑफ तारखेनुसार शेअर्स धारण करते, ती व्यक्ती evoting@nsdl.com ला संदेश पाठवून लॉगीन आयडी आणि पासवर्ड मिळवू शकते. तथापि, जर तो/ती व्यक्ती दूरस्थ ई–मतदानासाठी एनएसडीएलमध्ये आधीच नोंदणीकृत असेल तर तो/ती मते देण्यासाठी त्याचा/तिचा विद्यमान वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड वापरू शकतो.

जर भागधारकांचा ईमेल आयडी आधीच कंपनी/त्याचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए)/ डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत असेल तर नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर ई–मतदानासाठी लॉग इन तपशील पाठविला जात आहे. भौतिक स्वरूपात शेअर्स असलेले किंवा ज्यांनी कंपनीकडे आपला ईमेल पत्ता नोंदविला नाही असे भागधारक वार्षिक सर्वसाधारण सभेच्या नोटीसमध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करून बैठकीदरम्यान दूरस्थ ई–मतदानद्वारे किंवा ई–मतदान प्रणालीद्वारे आपले मत देऊ शकतात.

- ज्या भागधारकांना त्यांचा ईमेल पत्ता नोंदवायचा आहे त्यांनी खालील सूचनांचे पालन करावे :
- डिमॅट फॉर्ममध्ये शेअर्स असलेल्या भागधारकांना त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीने दिलेल्या प्रक्रियेनुसार त्यांच्या डिमॅट खात्यात तपशील नोंदणी/अद्ययावत करण्याची विनंती केली जात आहे.

भौतिक स्वरूपात शेअर्स असणाऱ्या भागधारकांना विनंती केली जाते की विहित फॉर्म आयएसआर –१ आणि इतर संबंधित फॉर्म कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटकडे दाखल करून तपशील नोंदवा/अद्ययावत करा, rnt.helpdesk@linkintime.co.in सदस्य कंपनीच्या वेबसाइटवरून www.sandu.in वर विहित फॉर्म डाउनलोड करू शकता.

तुमच्याकडे रिमोट ई–व्होटिंगशी संबंधित काही शंका असल्यास, कृपया www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि ई–व्होटिंग वापरकर्ता मॅन्युअल पहा किंवा संपर्क टेलिफोन क्र: +९१ २२ ४८८६७०००/१८००–२२२–९९० किंवा evoting@nsdl.com ला सक्रिय करण्यासाठी विनंती पाठवा. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित कोणत्याही तक्रारी असल्यास, कृपया ईमेल आयडीवर सुश्री सरिता मोटे, एनएसडीएलशी संपर्क साधा किंवा evoting@nsdl.com या इ–मेल आयडीवर संपर्क साधा.

ही जाहीर सूचना कंपनीच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध आहे उदा. www.sandu.in आणि स्टॉक एक्सचेंजच्या वेबसाइटवर जेथे कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध आहेत तेथे उपलब्ध आहेत.

याद्वारे नोटीस देण्यात आली आहे की कंपनीचे सदस्य आणि शेअर ट्रान्सफर बुक्सची नोंदणी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि लाभांश भरण्यासाठी शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ ते सोमवार, ३० सप्टेंबर २०२४ (दोन्ही दिवसांसह) बंद राहील. २०२३–२४ चा लाभांश, एजीएममध्ये घोषित केल्यास, ज्या सदस्यांचे नाव सदस्यांच्या नोंदणीत दिसते आणि डिपॉझिटर्सनी दिलेल्या तपशिलानुसार समभागांच्या लाभार्थी मालकांना कट ऑफ तारखेनुसार म्हणजे बुधवार, १९ सप्टेंबर २०२४ रोजी दिले जाईल.

**सांडू फार्मास्युटिकल्स लिमिटेडसाठी**
सही/–
**प्रतिका म्हांब्रे**
कंपनी सचिव

**दिनांक: ०५/०९/२०२४**
**ठिकाण : मुंबई**


# ४४ वर्षांपासून घेतलाय गणेश मूर्तीकलेचा वसा

## म्हापशातील राजेंद्र नार्वेकर घडवतात विविध मूर्ती; पीओपी, शाडूच्या मूर्तीमुळे परंपरा नष्ट होण्याची खंत

**थिवी (न. वा.)**

गेल्या ४४ वर्षांपासून शेट्येवाडा म्हापसा येथील चित्रकार राजेंद्र कांता नार्वेकर हे गणेश मूर्ती करतात. घरात चित्रकलेचा किंवा मातीच्या मूर्ती तयार करण्याचा वारसा नसतानासुद्धा राजेंद्र यांना चित्रकलेची आवड निर्माण झाली. त्यातूनच त्यांनी मातीच्या लहान लहान मूर्ती करायला सुरूवात केली. १९८० साली त्यांनी वाड्यावरील सार्वजनिक पूजनातील श्रीकृष्णाची मूर्ती तयार केली व तिथूनच त्यांच्या कलेला कलाटणी मिळाली. त्या वर्षांपासून वाड्यावरील अनेक लोकांनी चतुर्थीतील आपली गणेश मूर्ती तयार करण्याचे काम त्यांना दिले व त्यांनीही हे काम आवडीने स्वीकारले.

घरात कुणालाही ही कला अवगत नसल्याने त्यांना मूर्ती तयार करायला अनेक महिने लागायचे. आज त्यांना साथ द्यायला



**म्हापसा येथील गणेश मूर्ती चित्रशाळेत मूर्तीवर शेवटचा हात फिरवताना राजेंद्र नार्वेकर, सौ. लक्ष्मी, दिव्यांग व दुर्गेश.** (छाया : भारत बेतकेकर)

त्यांची पत्नी सौ. लक्ष्मी तसेच दोन पुत्र दिव्यांग व दुर्गेश आहेत.

या वर्षी १५० गणपतीच्या मूर्ती त्यांनी तयार केल्या आहेत. सर्वजण रंगकामात मग्न आहेत. परंतु याबाबत रौजेंद्र यांनी एक खंत व्यक्त केली आहे. त्यांनी याबाबत बोलताना, आज लोकांना चिकण मातीच्या मूर्ती नकोत. त्यांना एक तर प्लास्टर ऑफ पॅरिसच्या किंवा शाडू मातीच्या मूर्ती हव्या आहेत. त्या वजनाने हलक्या व त्या वरील रंग जास्त उठावदार दिसतात. त्यामुळे काही वर्षांनी चिकण मातीच्या मूर्ती बनवण्याची कला लुप्त होणार की काय अशी भीती व्यक्त केली. आज लोकांच्या मागणीमुळे आपल्यालाही मन मारून शाडू मातीच्या मूर्ती आणून त्यांना फक्त रंग काम व नक्षी काम करून विकाव्या लागतात. त्यामुळे पूर्वी जो आनंद मूर्ती घडवताना मिळायचा तो आता मिळत नाही. ज्याला कलेचा गंधही नाही त्यांनी व्यवसाय म्हणून मोठमोठ्या गणेशमूर्तींच्या चित्र शाळा सुरू केल्या आहेत. ते फक्त तयार मूर्ती आणून विकण्याचे काम करतात. त्यामुळे आपल्यासारख्या पारंपरिक चिकण मातीच्या मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांना मोठा त्रास होतो. सरकारने आता यावर काहीतरी तोडगा काढावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.